# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २२/०४/२०१७

ंगडचिरोली जिल्हयात मा. पोलीस अधिक्षक सो. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासनाकडून विविध गावांना ग्रामभेटी घेवुन तेथील ग्रामस्थांची चर्चा करुन त्यांच्या समस्या जाणुन घेतल्या जातात. तसेच त्या समस्या संबंधित प्रशासकीय विभागाकडे पाठवून त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जातो.

नक्षलविरोधी अभियाना दरम्यान मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, धानोरा श्री. अजित टिके यांनी पोमके सावरगांव हद्दितील मौजा मरकेगांव येथे भेट देवून तेथील ग्रामस्थांशी चर्चा केली व त्यांच्या समस्या जाणुन घेतल्या ग्रामभेटी दरम्यान प्रदिप रैनु दुगा, वय-७ वर्ष हा खुप दिवसापासुन आजारी असल्याचे समजले अधिक चौकशी करता तो टिपागढ नक्षल दलम उपकमांडर पंकज ऊर्फ रैनु बहादुर दुगा याचा मुलगा असल्याचे समजले.

टिपागढ नक्षल दलम उपकमांडर चा मुलगा असल्याबाबतचा कुठलाही पुर्वग्रह मनात न ठेवता त्या मुलाचा चांगला उपचार व्हावा यासाठी त्याला श्री. अजित टिके उपविभागीय पोलीस अधिकारी, धानोरा यांनी ग्रामीण रुग्णालय, धानोरा येथे उपचार सुरु केला. परंतु पुढील उपचारासाठी सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे भरती केले असता, त्याला सिकलसेल हा आजार असल्याचे निदान झाले. डॉक्टरांच्या मदतीने त्याचेवर पुढील उपचार सुरु आहे.

नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना त्यांच्या कुटुंबाविषयी दाखविलेल्या माणुसकीमुळे पोलीस प्रशासनावर सर्वत्र कौतुक होत आहे. नक्षल चळवळीच्या भुलथापांना बळी पळुन यात सामिल झालेल्या सदस्यांच्या कुटुंबियांना किती हालाखीच्या परिस्थितीत जीवन व्यतीत करावे लागत आहे. हेच यावरुन दिसुन येत आहे. त्यामुळे नक्षल चळवळीचा मार्ग सोडून मुख्य सामाजिक प्रवाहात सामिल होण्याचे आव्हान पोलीस प्रशासनाकडून करण्यात येत आहे.


12


12